# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.03.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

1. तिसरी आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेनं जातांना महिला कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असण्याच्या गरजेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा भर;
2. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्यापासून सुरू
3. तात्पुरत्या आणि ऑनलाइन कामगारांना - ए-बी-पीएम-जे-वाय चे लाभ मिळविण्यासाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचं आवाहन
4. अमेरिकेच्या कर आकारणीला सामोरे जाणाऱ्या देशांसोबत भारताला हुशारीने काम करावं लागेल, अर्थमंत्री निर्मला सीतारामन
5. येत्या 2 दिवसांत कोकण, गोवा, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता

आणि

6. चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अजिंक्यपदाचा सामना आज भारत आणि न्यूझीलंड दरम्यान दुबई इथे होणार

**महिला**

भारत तिसरी आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेनं अग्रेसर असताना महिला कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असण्याच्या गरजेवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भर दिला आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ‘नारी शक्ती से विकसित भारत’ या संकल्पनेवर नवी दिल्लीत आयोजित परिषदेत त्या काल बोलत होत्या. विकसित भारताचा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यामध्ये देशातील महिला महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या. महिलांना प्रगती करण्यासाठी आणि क्षमता सिद्ध करण्यासाठी समाजानं समर्थक वातावरण तयार करण्याच्या गरजेवर राष्ट्रपतींनी भर दिला.

**मोदी**

दरम्यान गुजरातमधील नवसारी इथे झालेल्या लखपती दीदी संमेलनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अडीच लाखांहून अधिक महिलांना काल महिला दिनानिमित्त 450 कोटी रुपयांचं वाटप केलं.

**मोदी मॉरिशस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी परवा मंगळवारी मॉरिशसच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. 2015 नंतर पंतप्रधानांचा हा पहिलाच मॉरिशस दौरा आहे. गेल्या 10 वर्षांत दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत झाले असून या भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली जाईल.

**बजेट**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्यापासून सुरू होत असून ते ४ एप्रिलपर्यंत चालेल. या दुसऱ्या सत्रात 2025-26 च्या अनुदान मागण्या आणि संबंधित विनियोग विधेयकावर चर्चा आणि मतदान होईल; या काळात एकंदर 20 बैठका होतील. बँकिंग कायदे (सुधारणा) विधेयक, कोस्टल शिपिंग विधेयक आणि रेल्वे (सुधारणा) विधेयक यासह अनेक विधेयकांवर या सत्रामध्ये  मंजूरीसाठी चर्चा होईल.  संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं  पहिलं सत्र 31 जानेवारी ते 13 फेब्रुवारी दरम्यान झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित केलं आणि अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला होता. पहिल्या सत्रात लोकसभेत 112 टक्के कामकाज झालं.

**ई श्रम पोर्टल**

कामगार मंत्रालयाने तात्पुरत्या  आणि ऑनलाइन पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना - आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना- ए-बी-पीएम-जे-वाय चे लाभ मिळविण्यासाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचं आवाहन केलं आहे. देशातील 31 हजारांहून अधिक सार्वजनिक आणि खाजगी रुग्णालयांमध्ये एबी-पीएमजेएवाय योजनेअंतर्गत प्रति कुटुंब 5 लाख रुपये द्वितीय आणि तृतीय स्तरावरील आरोग्य सेवांसाठी मिळू शकतात . देशाच्या अर्थव्यवस्थेत अशा कामगारांचं  योगदान ओळखून, 2025-26 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात  यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. 2024-25 मध्ये एक कोटीहून अधिक कामगारांना रोजगार मिळण्याचा अंदाज असून 2029-30 पर्यंत अशा कामगारांची संख्या 2 कोटी 35लाखांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

**सीता रामन भारत अमेरिका**

वाढत्या जागतिक कर वादाच्या पार्श्वभूमीवर, अमेरिकेच्या कर आकारणीला सामोरे जाणाऱ्या देशांसोबत भारताला हुशारीने काम करावं  लागेल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. काल मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात - परवडणाऱ्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांतर्गत उद्योगांच्या हिताचंही भारत रक्षण करेल, असं त्यांनी सांगितलं. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि पुरवठा साखळी सुरळीत करण्यासाठी भारत अमेरिकेसोबत चांगला व्यापार करार करण्याचा प्रयत्न करत आहे. 2030 पर्यंत व्यापार 500 अब्ज डॉलर्सपर्यंत दुप्पट करण्याच्या उद्देशाने भारत आणि अमेरिका द्विपक्षीय व्यापार करारावर वाटाघाटी करत आहेत. जीएसटी दरांमध्ये कपात आणि सुसूत्रता यासंबंधीची  चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचं त्या म्हणाल्या.

**व्यापार शुल्क**

दरम्यान नुकत्याच झालेल्या द्विपक्षीय व्यापार करारांतर्गत भारताने ऑस्ट्रेलिया, युएई, स्वित्झर्लंड आणि नॉर्वे सारख्या प्रमुख विकसित देशांसाठी सरासरी लागू केलेल्या व्यापार शुल्कात लक्षणीय घट केली आहे. सध्या युरोपियन युनियन आणि युनायटेड किंग्डमसह इतर देशांबरोबर अशाच प्रकारच्या वाटाघाटी सुरू असून अमेरिकेसोबत सध्या सुरू असलेल्या चर्चाकडे  या दृष्टिकोनातून पाहिलं पाहिजे असं सूत्रांनी म्हटलं आहे. यंदा फेब्रुवारीमध्ये, भारत आणि अमेरिका यांनी परस्पर फायदेशीर, बहु-क्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार करार (BTA) च्या पहिल्या टप्प्यावर वाटाघाटी करण्यास सहमती दर्शविली आहे.

**जयशंकर**

भारत जगाकडे आत्मविश्वासाने पाहत असून व्यापार, गतिशीलता, गुंतवणूक, पर्यटन आणि विद्यार्थ्यांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत अधिक कार्य करू इच्छितो असं परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे . डॉ. जयशंकर यांनी काल यूके मधील मँचेस्टर इथं भारतीय समुदाय आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी संवाद साधताना – भारत आणि यूके दरम्यान परस्पर संबंध अधिक दृढ होण्याची क्षमता असल्याचं सांगितलं. भारतीय समुदायाने दिलेल्या योगदानाची कदर करत त्यांच्यामुळेच देशाची प्रतिमा जगभरात साकारली जाते असं ते म्हणाले.

**इंडिया टुडे-कॉन्क्लेव्ह**

भारतानं तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती करण्याची गरज आहे, असं मत हवाई दलाचे प्रमुख, एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी काल व्यक्त केलं. देशात विकसित होणाऱ्या नवकल्पना इतर देशांना मार्गदर्शक ठरत असतांना तर ही गरज अधिक महत्वाची आहे, असं ते म्हणाले. ‘आजचा भारत’ परिषदेमध्ये सिंग बोलत होते. दीर्घकाळ चालणाऱ्या युद्धासाठी तयार राहणं ही काळाची गरज असल्याचं मतही सिंग यांनी व्यक्त केलं. तंत्रज्ञानाची शाश्वतता महत्वाची असल्याचं मत नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी व्यक्त केलं. तंत्रज्ञानामुळेच लहान देशही मोठ्या शत्रूंना आव्हान देण्यास सक्षम होतात असं सांगताना संरक्षण क्षेत्रात आवश्यक असलेल्या स्वावलंबनावर त्यांनी भर दिला.

**अश्विनी वैष्णव**

नवीन औद्योगिक आणि ज्ञान क्रांतीच्या या युगात, कृत्रिम बुद्धीमत्तेच्या उदयामुळे, भारत केवळ सेवा क्षेत्रातच नाही, तर एक प्रमुख तंत्रज्ञान निर्माता म्हणूनही उदयास येईल, असा विश्वास केंद्रीय माहिती प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मुंबईत एका कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. भारत हा जगातल्या सर्वाधिक स्टार्टअप असलेल्या पहिल्या तीन राष्ट्रांपैकी एक आहे अश्या शब्दांत त्यांनी देशातल्या स्टार्टअप परिसंस्थेचं कौतुक केलं. गेल्या दशकात 45 हजार किलोमीटर रेल्वेचं विद्युतीकरण झालं असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. स्वच्छ, शाश्वत ऊर्जेसाठी रेल्वे मंत्रालय वचनबद्ध असल्याचं सांगून या वर्षा अखेरीपर्यन्त 100 टक्के रेल्वे विजेवर चालतील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज उप-हिमालयीन पश्चिम बंगालमध्ये काही ठिकाणी विजांसह वादळाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील 4 दिवस जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हलका ते मध्यम पाऊस किंवा हिमवृष्टी होण्याची शक्यता आहे. येत्या 2 दिवसांत कोकण, गोवा, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये उष्णतेच्या लाटेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. गुजरात, कर्नाटक किनारी, केरळ आणि माहे इथे काही ठिकाणी उष्ण आणि दमट परिस्थितीचा अंदाज आहे.

**कबड्डी**

भारतीय महिला कबड्डीपटूंनी आशिया करंडक पाचव्यांदा जिंकला आहे. इराणमध्ये तेहरान इथं सहाव्या आशिया महिला कबड्डी अजिंक्यपदाच्या सामन्यात त्यांनी काल यजमान इराणचा 32-25 गुणांनी पराभव केला. या संपूर्ण स्पर्धेत भारतीय महिला संघ अजिंक्य राहिला.

**महिला क्रिकेट**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत काल लखनौ इथे झालेल्या सामन्यात, UP वॉरियर्सने रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (RCB) चा 12 धावांनी पराभव केला. या पराभवामुळे गतविजेता RCB संघ स्पर्धेतून बाहेर पडणारा दुसरा संघ ठरला आहे. RCB सध्या 7 सामन्यांत 4 गुणांसह पॉइंट टेबलमध्ये तळाशी आहे, तर UP वॉरियर्सचा प्रवास ६ गुणांसह आधीच संपला आहे. या निकालामुळे गुजरात जायंट्स आणि मुंबई इंडियन्स संघ दिल्ली कॅपिटल्ससोबत पुढे जातील. मुंबई इंडियन्सचा सामना उद्या मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर गुजरात जायंट्सशी होईल.

**क्रिकेट**

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अजिंक्यपदाचा सामना आज भारत आणि न्यूझीलंड दरम्यान दुबई इथे दुपारी दोन वाजल्यापासून होणार आहे. भारत या स्पर्धेत अजिंक्य राहिला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.**